# भारतीय जनता पक्ष

(केंद्रिय कार्यालय)

11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001

फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787

## संसदेचे संयुक्त सत्र आणि राष्ट्रपतिंच्या संबोधनावरील आभार प्रस्तावासंदर्भात श्री अरुण जेटली यांनी केलेल्या वक्तव्याचा सारांश

युपीए सरकारने सत्तेत नऊ वर्षे पूर्ण केले. कोणत्याही सरकारसाठी सत्तेतील नऊ वर्षाचा कालावधी हा देशाच्या भावी बदलाकरिता पुरेसा असू शकतो. युपीए सरकार सत्तेत आली तेव्हा देशाचे चित्र उज्जवल होते. जगात भारताचे नाव गुंतवणूकीसाठी उत्तम प्रकारे झाले होते. एनडीए सरकारने सत्ता युपीए सरकारला सोपवली तेव्हा देशाचा विकासदर हा 8.4 टक्के इतका होता. मात्र आता युपीए सरकारचे शेवटचे एक वर्ष बाकी आहे तेव्हा गुंतवणूकीसाठी जगातील नकाशात भारताचे स्थान पहिल्याइतके पूढे गेलेले नाही. ब्रीक्स देशाच्या गटामधून भारत देश दूर होईल अशी भीती सतावत आहे. सर्वत्र निराशा, शासनाबद्दल अविश्वास, नीतिगत पक्षाघात आणि परिवर्तनाची पडझड दिसून येत आहे. युपिए सरकारने तेजस्वी देशाला निराशेच्या खाईत लोटले आहे.

### युपिए सरकारचे शासन मॉडेल

मी वारंवार सांगत होतो की युपिए सरकारचे शासन मॉडेल जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीकरिता चालत नाही. पक्षातील स्वाभाविक नेते आहेत तेच पंतप्रधान होऊ शकतात. युपिए सरकारचे शासन मॉडेल असे आहे की ज्यात बोर्ड निर्णय घेतो आणि सीईओ त्याचा अंमल करतो. असे तर कॉर्पोरेट

गवर्नन्समध्ये चालते. संपूर्ण देशाचे संचालन अशा प्रकारे चालत नाही. पंतप्रधानांजवळ राजकीय सत्ता नसल्याने खालील समस्या उद्भवतात...

- नेतृत्वातील आणीबाणी
- नीतिगत पक्षाघात
- भ्रष्टाचार आणि चूक झाल्यास मंत्र्यांवर कोणतेच नियंत्रण नाही.

सरकारच्या नेतृत्वाचा अभाव स्पष्टपणे दिसत आहे. मागील नऊ वर्षात जे काही निर्णय घेण्यात आले ते राष्ट्रीय सल्लागार समितीनेच घेतले आहेत. बँक कर्जमाफी आणि एम्प्लॉयमेंट गॅरंटी स्कीम च्या अंमलबजावणीतील काही खोट्या नीतिमुळे सध्याचे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. कर्जमाफीचा फायदा पात्र नसलेल्यांना मिळाला आहे. मनमानीपणामुळे राष्ट्रीय संसाधनाचा उपयोग भरपूर करण्यात आला आणि कोणतेही प्रकल्प पूर्ण न करता फायदा मात्र पूरेपूर घेण्यात आला आहे.

**अर्थतंत्रातील परिस्थिती**

भारताला विकासाची आवश्यकता आहे यात कोणतेच दुमत नाही. स्वातंत्र्यानंतरच्या चार दशकात गरीबी निर्मुलन सारखा लोकप्रिय नारा देणे सुद्धा आता निरर्थक आहे. भारताला धीम्या गतीचा विकास परवडणारा नाही.

उच्च विकासदर तर पाहिजेच त्याशिवाय चांगली आर्थिक प्रवृत्ती, रोजगारीच्या अधिक संधी, योग्य पायाभुत सुविधा आणि अधिक महसुल जरुरी आहे.

भारतातील एकूण जनसंख्येपैकी मोठ्या प्रमाणातील जनसंख्या ही कृषिक्षेत्रात उत्पादनक्षेत्रात वसणे आवश्यक आहे. भारताला स्वस्त माल उत्पादक हब प्रमाणे विकसित होणे गरजेचे आहे. उत्पादनक्षेत्रातील विकासदर 12 ते 14 टक्के असला तरच ते एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा 25 टक्के हिस्सा बनेल.

त्याकरिता तात्काळ मोठ्याप्रमाणात पायाभुत प्रकल्प हाती घेण्यात आले पाहिजेत.

**भ्रष्टाचार**

सरकारी नेतृत्वावर कोणतेही अंकुश नसल्याने भ्रष्टाचार हा युपिए सरकारचा हॉलमार्क बनला आहे. युपिए सरकारमध्ये विविध प्रकारचे मंत्री आहेत. काही अभिमानी आहेत, काही खुपच भ्रष्टाचारी आहेत, तर काही अकार्यक्षम आहेत. भ्रष्टाचार गुंतवणुकीत भारताला पसंतीचा देश म्हणुन प्रतिष्ठा मिळाली असल्याचे दिसत आहे. आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार भारतात गुंतवणूक करताना बाचकत आहेत. गुंतवणूकीची रीवर्स फ्लाईट भारताला महाग पडेल असेच दिसते. भारतीय नेत्यांना आता गंभीर होऊन भ्रष्टाचा-यांविरुद्ध त्वरित कारवाई करण्याची गरज आहे.

**दहशतवाद, घूसखोरी आणि राष्ट्रीय सुरक्षा**

काश्मीर भारताचा अविभाज्य अंग आहे. हळू हळू पण काश्मीरमध्ये शांती प्रस्थापित होत आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये प्रादेशिक एकतेसाठी भारताला सीमेपलिकडील कोणतीही सूचना किंवी चर्चेकडे लक्ष नाही दिले पाहिजे. स्थानिक जनतेबरोबर दयाभाव राखण्याची गरज आहे. खास करुन विकास आणि एकते वर भार देणे गरजेचे आहे. आपण जनतेच्या बाजूने राहून विभाजन करणा-या विरुद्ध नीति अवलंबिली पाहिजे. भारतीय संसदेवर 2001 साली झालेल्या हल्ल्यातील आरोपीला फाशी देण्यात आली त्याविरुद्ध जी प्रतिक्रिया काश्मीर खो-यात पाहायला मिळाली ती कशाही प्रकारे सहन करण्यासारखी नाही आहे. भारताची एकता आणि सार्वभौमत्त्वावर हल्ला करणा-यांना शिक्षा पण द्यायची नाही?

भारतीय लोकशाहीत माओवादी हिंसा पण बघायला मिळाली. माओवादी हे आदिवासी विस्तारात गरीबांचे शोषण करत आहेत. राष्ट्रीय संसाधनांच्या उपयोगासाठी आपल्याला ठोस नीति घडवली पाहिजे.

**हैद्राबाद बॉबस्फोट**

नुकतेच हैद्राबाद बॉबस्फोटात अनेक निर्दोष लोक मारले गेले आणि अनेक जण जखमी झाले. दहशतवादावर नियंत्रण मिळवण्यासाठी गुप्तचर यंत्रणा शक्तिशाली बनण्याची गरज आहे. गुप्तचर विभाग आणि सुरक्षा दल 100 टक्के यशस्वी झाली पाहिजे. केंद्र सरकारने राज्य सरकारच्या सहयोगाने दहशतवादाशी लढा दिला पाहिजे. दोघांदरम्यानचा वाद टळला पाहिजे. या विचारांच्या आधारेच एनसीटीसीची रचना केली पाहिजे.

**भारत आणि शेजारील देश**

भारताने कधीही शेजारील देशाच्या आंतरिक बाबतीत हस्तक्षेप करण्याची नीति अवलंबिली नाही. भारताला शेजारील देशासोबत मैत्रिपूर्ण संबंध हवे आहेत, परंतु त्याचबरोबर देशातील स्थिरता ही देखील तितकीच महत्त्वाची आहे. पाकिस्तानमध्ये गडबड सुरु आहे. त्या देशावर कोणाचे नियंत्रण आहे, ते समजत नाही असे नाही. आपले पंतप्रधान पाकिस्तानासोबत वाटाघाटीची अपेक्षा ठेवून आहेत. नुकतेच उद्वेगजनक पावले उचलल्याने त्यांच्या आशेवर पाणी फेरले आहे. नेपाळ हा भारत आणि चीन दरम्यान एक महत्वपूर्ण देश आहे. नेपाळ बरोबर आपले ऐतिहासिक संबंध आहेत. तिथे घटनात्मक संकट सुरु आहेत. बांग्लादेशाबरोबर घूसखोरी संदर्भातील समस्या सोडवण्यासाठी आपल्या देशातील जनतेला योग्य वाटेल असा मार्ग अवलंबिला पाहिजे. श्रीलंकेत मानव अधिकाराचे उल्लंघन तामिळनाडू आणि अन्यत्र परिणाम करत आहे. मालदीव मध्ये परिस्थिती अशाप्रकारे बिघडली आहे की त्यांच्या माजी अध्यक्षांना भारतीय हायकमिशनचा आश्रय घ्यावा लागत आहे.

**महिला**

भारतीय समाजात 50 टक्के महिला आहेत. असे असूनही त्यांच्याविषयी भेदभाव केला जातो. त्याबाबत आपल्याला आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे. दिल्लीत झालेला बलात्कार कांड आणि काही अन्य घटनांमुळे आपली मान लाजेने खाली गेली. संस्कारी समाजात असे कदापीही सहन केले जाणार नाही.

युपिए सरकार आता सत्ता गमावण्याच्या मार्गी पुढे जात आहे. अर्थकारणाची अव्यवस्था दरीत लोटत आहे. अशा परिस्थितीत भक्कम लोकशाहीची आशा पण कशाप्रकारे करु शकतो. कार्यक्षम सरकार साठी राजकीय स्पर्धा ठरली तरच देशाकरिता आशेचा किरण दिसून येईल.

अकार्यक्षम आणि भ्रष्ट सरकार देशाला मोठे नुकसान पोचवत आहे. एका रोमन सेनेटर ने सांगितले होते कीः

त्याने जगाला दरीत ढकलले, अर्धनग्न लोकांचे वस्त्रहरण करणारे आणि भुकेल्या लोकांची जमीन काढून घेतलेले....लालची आहेत. ते पूर्वग्रहाच्या भावनेने पीडित आहेत. या सर्वादरम्यान त्यांनी स्वताचे साम्राज्य उभे केल....तो जागा झाला तर फक्त रण दिसायचे, ज्याला तो शांती म्हणायचा.

(आर.के.सिन्हा)

मानद मंत्री

भाजप संसदीय पक्ष